मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# शेतकरी आणि बि



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: M. Maillot; Lazarus

रूपान्तरकार: E. Frischbutter; Sarah S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

Alastair Paterson

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2020 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

ऐके दिवशी येशू तलावाच्या बाजूला शिकवित होता. त्याचे ऐकण्यासाठी पुष्कळ लोक जमा झाले होते. लोकांची गर्दी फारच झाली.

आता येशू काय करणार?



त्याने जवळच एक मचवा पाहिला, येशू त्या मचव्यात जाऊन बसला. आता येशू लोकांना पाहू शकत होता आणि लोक येशूला पाहू शकत होते व त्याची वाणी ऐकू शकत होते.



येशू दाखले सांगू लागले – ज्यातून लोक देवाविषयीच्या गोष्टी शिकत असत, अशा सर्वसामान्य बाबींविषयीच्या गोष्टी म्हणजे दाखले होय.



"एका शेतकऱ्याने त्याच्या शेतात बी पेरले." चित्रविरहित परंतू शब्दांनी तयार असलेल्या अशा गोष्टी येशूच्या राहात असे.



लोकांनी शेतकऱ्याला बी पेरतांना पुष्कळ वेळा पाहिले
असणार म्हणून येशू गोष्ट सांगत असतांना पेरणी करणाऱ्या
शेतकऱ्याचे चित्र लोक सहज मनात
उभे करु शकत होते.




काही बी वाटेवर पडले. पाखरांनी
सर्रकन् येऊन ते खाऊंन टाकले.

काही बी खडकाळ जमीनीवर पडले. तेथील बी लवकर छोटेसे रोपटे असे उगवले. तेथे त्यास माती फारशी खोल नव्हती, सूर्य वर आला तेव्हा ते करपले व त्यास मूळ नव्हते म्हणून ते वाळून गेले.



काही बी कांटेरी झाडांमध्ये पडले. त्याला
पिक आले नाही. त्या लहानशा रोपट्याला
काटेरी झाडांनी वाढून त्याची वाढ खुंटविली, आणि
आवश्यक सुर्यप्रकाश आणि पाऊस
यांचा त्या रोपट्याला पुरवठा
होऊ दिला नाही.



आणि काही बी चांगल्या जमिनीत पडले. जसजसे दिवस गेले, ती रोपे वाढली व निरोगी रोपांनी भरपूर पिक दिले. त्या शेतकऱ्याला निश्चितच आनंद झाला असणार.



या गोष्टीच्या अखेरिस, शिष्य येशू जवळ आले. "आपण दाखल्यांनी का शिकवता?" असे त्यांनी येशूला विचारले.



येशूने त्यांना सांगितले जर लोक देवावर खरोखर प्रीति करत असतील तर त्यांना देवाविषयी समजण्यास दाखल्यांमुळे मदत होते. जे लोक देवावर प्रीती करत नाही ते दाखला समजू शकत नाही.




येशूने दाखला समजवून सांगितला. त्याने म्हटले
बी म्हणजे देवाचे वचन आहे. वाटेवर पडलेले बी असे
आहे की जे देवाचे वचन ऐकतात परंतु त्यांना देवाचे वचन
समजत नाही. देव जे
काही सांगतो ते विसरावे
असे सैतान करतो.

काही लोक देवाच्या वचनाचा स्विकार लगेच करतात. ते खडकाळी जमिनीवर पडलेल्या बी सारखे आहेत. परंतू ते देवावर प्रीति करतात म्हणून कोणी त्यांची निंदा केली किंवा थट्टा केली तर दुःखद घटना घडतात.



आनंदाने येशूच्या मागे जाणारे हेच ते लोक मागे फिरतात व देवाच्या आज्ञा पाळत नाही. देवाला अनुसरण्याची किंमत ते मोजू इच्छित नाही. हि किती दुःखाची बाब आहे की ते देवापेक्षा मित्रांना अधिक खुश करण्याचा प्रयत्न करतात.



दाखल्यातील काटेरी झुडपे
म्हणजे जगातील चिंता काळजी
आणि पैशांविषयीचे प्रेम, यांनी
त्यांची जिवने भरलेली असतात.
ते पैसा आणि इतर गोष्टी
मिळविण्याचा इतका प्रयत्न
करतात की त्यामुळे देवाला
त्यांच्या जीवनातून
ते काढून टाकतात.



परंतू चांगल्या जमिनीत पडलेले; ज्याने चांगले पिक दिले ते बी म्हणून जणूकाय देवाचे वचन लोकांच्या अंतःकरणात शिरुन लोकांची जिवने बदलून टाकते. हे लोक देवाचा सन्मान करुन त्याची सेवा करतात.



गर्दीतील लोक येशूला सोडून जाऊ इच्छित नव्हते. पुष्कळांना देवाचे अनुयायी होऊन त्याला संतुष्ट करावेसे वाटे. देवाचे आज्ञापालन कसे करावे हे समजण्यास येशूच्या दाखल्याने मदत केली.



शेतकरी आणि बि

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मत्तय १३

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16